# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि नई तालीम यातील साम्य

**डॉ. रुपेश वामनराव खुबाळकर**[1]
सहाय्यक प्राध्यापक,
वाणिज्य विभाग
नूतन आदर्श कला, वाणिज्य व श्रीमती म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड

**डॉ. गजानन गोपाळराव बाबडे**[2]
सहाय्यक प्राध्यापक
वाणिज्य विभाग
नूतन आदर्श कला, वाणिज्य व श्रीमती म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड

---

**गोषवारा (Abstract) :**

*29 जुलै 2020 रोजी, भारत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ला मंजूरी दिली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (National Education Policy) 2020 हे महत्त्वाकांक्षी बदल घडवून आणेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 मुळे सर्वांसाठी शालेय शिक्षण सुलभ होईल अशी सरकारची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांमधील गळतीचे प्रमाण कमी करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. भारतातील मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलवून शिक्षण मंत्रालय असे केले आहे. पुढील काही महिन्यांत इतर अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने केली जाईल. या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट 2040 पर्यंत शैक्षणिक व्यवस्थेत सुधारणा करण्याचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 समतापूर्ण, सृजनशील, सुसंस्कृत समाजाचे निर्माण व्हावे या दृष्टीने निर्माण केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि महात्मा गांधीजी प्रणीत 'नई तालीम' चा अभ्यास केल्यास दोघांत बरेचसे साम्य दिसून येते. या शोधनिबंधात राष्टीय शैक्षणिक धोरण 2020 आणि 'नई तालीम' यातील साम्य शोधण्याचा प्रयत्न केला आहे.*

**मुख्य शब्द (Keywords):** *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, महात्मा गांधी, नई तालीम, रोजगार, आत्मनिर्भर.*

---

**प्रस्तावना (Introduction) :**

34 वर्षांनंतर, भारतीय केंद्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) मंजूर केले, ज्यांनी 1986 च्या शिक्षणावरील राष्ट्रीय धोरणाची जागा घेतली आहे. या धोरणाचा भारताच्या शैक्षणिक क्षेत्रात पूर्णपणे बदल करण्याचा मानस आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये देशातील शाळा आणि उच्च शिक्षण संस्थांमधील क्रांतिकारक सुधारणांचा समावेश आहे. ग्रामीण तसेच शहरी भागात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 उच्च शिक्षण तसेच व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे एक व्यापक व्यवस्था प्रदान करणार आहे. पुढील काही वर्षांत देशाची शैक्षणिक चौकट आणि अभिमुखता सुधारणे हे नवीन शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. या नवीन शैक्षणिक धोरणचा 2025 पर्यंत शालेय शिक्षणासाठी 100% आणि उच्च शिक्षणासाठी 50% असे एकूण नोंदणी प्रमाणासह 2030 पर्यंत भारतामध्ये सार्वत्रिक शिक्षण साध्य करण्याचा मानस आहे. आज 15 लाखांहून अधिक भारतीय शाळा किंवा महाविद्यालयात आहेत हे लक्षात घेता, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे मोठ्या प्रमाणावर अमलात आणणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारताच्या शैक्षणिक व्यवस्थेचे आधुनिक, प्रगतीशील आणि समानतेत रूपांतर करण्याचा एक प्रशंसनीय आणि महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि महात्मा

गांधी प्रणित नई तालीम चा अभ्यास केल्यास या दोघात बरेचसे साम्य आढळून येते. माजी उपराष्ट्रपती एम. व्यंकय्या नायडू हे त्यांच्या एका वक्तव्यात म्हणाले की नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 शालेय स्तरावर मातृभाषेला शिक्षणाचे माध्यम म्हणून महत्त्व देऊन महात्मा गांधीच्या 'नई तालीम' (नवीन शिक्षण) चे अनुसरण करते. 1937 मध्ये महात्मा गांधींनी वर्धा येथे प्रस्तावित केलेल्या 'नई तालीम'मध्ये विद्यार्थ्यांना मोफत सक्तीचे शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षणासोबतच मातृभाषेला शिक्षणाचे माध्यम बनविण्यावर भर देण्यात आला होता. महात्मा गांधीनी शिक्षणाविषयी सांगितलेला मार्ग अमलात आणण्यासाठी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून जवळपास अमृत कालखंड लोटला. यावरून महात्मा गांधीजींच्या आचार-विचारांची प्रासंगिकता आजही दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives)**

संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

○ ‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020’ मुळे शिक्षण व्यवस्थेत होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.

○ 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020' आणि 'नई तालीम' यातील साम्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

शोध निबंधासाठी माहितीचे संकलन पुस्तके, अहवाल, मासिके, वृत्तपत्रे आणि वेबसाइट्स यांसारख्या दुय्यम स्त्रोतांद्वारे केले आहे.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020)**

शिक्षण मंत्रालयाने 29.07.2020 रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 जाहीर केले आहे. जवळपास 34 वर्षांच्यानंतर, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 लागू करून, भारतातील शैक्षणिक धोरणात बदल होत आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने नवीन 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 2020' ला मंजुरी दिली. देशातील शाळा आणि उच्च शिक्षण प्रणालींमध्ये परिवर्तनात्मक सुधारणा करणे आणि भारतातील शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे हा या नवीन धोरणाचा उद्देश आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील महत्वपूर्ण बदल खालीलप्रमाणे आहेत.

- शालेय शिक्षणाची विद्यमान 10+2 रचना बदलवून 5+3+3+4 करण्यात येईल. हि रचना शालेय स्तरावर 3 ते 8 वर्षे, 8 ते 11 वर्षे, 11 वर्षे ते 14 वर्षे आणि 14 ते 18 वर्षे वयोगट अशी राहील.
- शालेय परीक्षा फक्त 3, 5 आणि 8 च्या वर्गात घेतल्या जातील आणि इतर वर्गांचे मूल्यांकन शाळा अधिकाऱ्यांद्वारे केले जाईल.
- प्रत्येक राज्यात बालभवन स्थापन केले जातील. हे निवासी शाळा (Boarding School) असेल, जेथे विद्यार्थी कला, खेळ, करिअर-संबंधित क्रियाकलापांमध्ये भाग घेऊ शकतील.
- एक शैक्षणिक बँक क्रेडिट (Academic Bank of Credit) ची स्थापना केली जाईल, जिथे विद्यार्थ्यांनी मिळवलेली क्रेडिट्स साठवली जातील, जेणेकरून अंतिम पदवी पूर्ण झाल्यावर त्याची गणना करता येईल.
- भारतात राष्ट्रीय पुस्तक संवर्धन धोरण तयार केले जाईल. या नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत, राष्ट्रीय मिशन

किंवा कार्यात्मक साक्षरता आणि संख्यात्मकता शिक्षण मंत्रालयाद्वारे लवकरच स्थापित केली जाईल. हे तिसऱ्या वर्गापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहील आणि 2025 पर्यंत त्याची अंमलबजावणी केली जाईल.

- लिंग समावेशक निधी (Gender Inclusion Fund) आणि विशेष शैक्षणिक क्षेत्र (Special Education Zone) स्थापन करण्यावर भर देण्यात आला आहे. वंचित लोकांसाठी याचा फायदा होईल.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये पारंपारिक ज्ञानाची आधुनिक विचारसरणीशी सांगड घालण्याची आकांक्षा आहे आणि माध्यमिक शाळेपासून व्यावसायिक शिक्षण सुरू करण्यात येणार आहे. शिक्षणातील तंत्रज्ञानावर भर देण्यात आला आहे आणि शैक्षणिक नियोजन, अध्यापन आणि शिक्षण मूल्यांकनामध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न आहे.
- बहुभाषिकता आणि भारतीय भाषांच्या संवर्धनावर भर देण्यात येणार आहे. किमान इयत्ता 5 पर्यंत शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषेतून देण्यात येईल. तसेच इयत्ता 8 आणि त्यापुढील शिक्षण मातृभाषा, स्थानिक भाषा आणि प्रादेशिक भाषा यातूनसुद्धा उपलब्ध असेल.
- कोणत्याही पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याने केवळ एक वर्ष पूर्ण केल्यास त्याला प्रमाणपत्र मिळेल, दोन वर्षे पूर्ण केल्यास त्याला पदविका प्रमाणपत्र मिळेल आणि पूर्ण अभ्यासक्रम पूर्ण केल्यास त्याला पदवी प्रमाणपत्र मिळेल. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याने मध्येच अभ्यासक्रम सोडल्यास त्याचे एकही वर्ष वाया जाणार नाही. सर्व विद्यापीठांचे सर्व पदवी अभ्यासक्रम आणि प्रत्येक अभ्यासक्रमाला एकल प्राधिकरणाद्वारे नियंत्रित केले जाईल. याअंतर्गत टप्प्याटप्प्याने महाविद्यालयांना स्वायत्तता दिली जाईल.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे उद्दिष्ट अधिक विद्यार्थी-केंद्रित (Student Centric) असलेली शिक्षण प्रणाली तयार करणे, विद्यार्थ्यांना त्यांची आवड जोपासण्यासाठी लवचिकता देणे आणि त्याच वेळी त्यांची कौशल्ये वाढवणे हे आहे. हे धोरण योग्य रीतीने अंमलात आणल्यास, शेवटी आपले तरुण अधिक रोजगारक्षम बनतील.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने ज्ञानाची सुसंवाद आणि अखंडता सुनिश्चित करण्यासाठी सर्व विज्ञानांमध्ये सर्वांगीण दृष्टिकोन म्हणून आंतर-विषय शिक्षण प्रस्तावित केले आहे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 भारतातीलया उच्च शिक्षणाला मोठ्या बहुविद्याशाखीय विद्यापीठे आणि महाविद्यालये यांना समूह (Cluster) बनविण्यासाठी प्रवृत्त करेल. याद्वारे सादर केलेल्या बदलांचा एक भाग म्हणजे कला आणि विज्ञान, अभ्यासक्रम आणि अतिरिक्त क्रियाकलापांमध्ये, व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवाहांमध्ये कोणतेही कठोर पृथक्करण असणार नाही. विद्यार्थी कोणता अभ्यासक्रम करत आहे, मग ते अभियांत्रिकी असो किंवा व्यवस्थापन असो, ते त्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून 'कला' या बॅनरखाली जोडलेले विषय निवडण्यास सक्षम असतील.

**नई तालीम :**

नई तालीम हा शब्द दोन शब्दांचा संयोग आहे, ज्यात 'नई' म्हणजे 'नवीन' आणि 'तालीम' - उर्दू शब्द - म्हणजे 'शिक्षण' होय. 1937 मध्ये महात्मा गांधींनी महाराष्ट्रातील वर्धा येथे झालेल्या परिषदेत 'नई तालीम'च्या

माध्यमातून शिक्षण व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याची महत्त्वाची कल्पना पेरली. याला 'नई तालीम' असे म्हटले जाते. यालाच ‘बुनियादी तालीम’ (मूलभूत शिक्षण) म्हणूनही ओळखले जाते. यात विद्यार्थ्यांना मोफत सक्तीचे शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण देण्याबरोबरच मातृभाषेला शिक्षणाचे माध्यम बनविण्यावर भर देण्यात आला होता. वैयक्तिक विकास आणि सामाजिक विकास हे नई तालीमचे उद्दिष्ट होते. शिक्षण स्थानिक पातळीवर सुलभ तंत्रज्ञानासह कार्य-केंद्रित असावे असा याचा मूलभूत दृष्टीकोन होता. नई तालीम अंतर्गत व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक, भावनात्मक आणि आध्यात्मिक विकास व्हावा हे लक्ष्य होते. महात्मा गांधींच्यानुसार कौशल्य विकास हा नई तालीमचा अविभाज्य घटक आहे. गांधीजींचा असा विश्वास होता की शिक्षणाला कामापासून वेगळे केल्यामुळे समाजात अनेक सामाजिक अन्याय झाले. शिक्षणामुळे 3H म्हणजे Hand (हात), Heart (हृदय) आणि Head (मस्तिष्क) विकसित झाला पाहिजे असा त्यांचा समज होता.

अशा शिक्षणामुळे गावे स्वावलंबी होतील, असा गांधीजींचा विश्वास होता. ब्रिटीश राजवटीच्या काळातील शिक्षण हे भारतीयांच्या उपयोगाचे नाही हे गांधींना जाणवले होते. गांधीजीनी सूतकाम, विणकाम, टोपलीकाम, चामड्याचे काम आणि मातीकाम यांसारख्या जाती-आधारित व्यवसायांशी संबंधित असलेल्या 'अस्पृश्यते' या प्रमुख सामाजिक दुष्प्रवृत्तीशी लढण्याचे साधन म्हणूनही त्यांनी शिक्षणाचा विचार केला. अश्याप्रकारे 'नई तालीम' ही शिक्षा पद्धती पुस्तकी ज्ञानासोबत रोजगारांमुख प्रशिक्षण देते.

**नई तालीमची तत्वे:**

नई तालीम मध्ये शरीर, मन आणि आत्मा यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्व विकासाचा दृष्टीकोन आहे. नई तालीमच्या मुख्य बाबी खालीलप्रमाणे आहेत.

- **हस्तकलेच्या कामाबरोबरच मातृभाषेतून शिक्षण :** ७ ते १४ वयोगटातील प्राथमिक शिक्षण हे हस्तोद्योग शिकविणारे असावे. मातृभाषा हे प्राथमिक शिक्षणाचे सोपे आणि नैसर्गिक माध्यम आहे. आपल्या देशात मुलांचा शब्दसंग्रह मातृभाषेचा आहे आणि त्याद्वारे ते सहजपणे आपले विचार व्यक्त करू शकतात किंवा इतरांचे विचार स्वीकारू शकतात. इंग्रजीत देण्यात आलेले शिक्षण हे अनैसर्गिक आणि मुलांवर ओझे होते.
- **कार्य हे परिसरातील सर्वात उपयुक्त व्यावसायिक गरजांशी जोडलेले असावे :** विद्यार्थ्यांच्या स्थानिक परिसरातील हस्तोद्योगाशी संलग्न करून त्यांना शिक्षण दिले जावे. शिकण्याची पद्धत व्यावहारिक उपक्रम आणि अनुभवावर आधारित असावी. शिक्षण जितके अधिक उपक्रम आणि व्यावहारिक ज्ञानावर असेल तितक्या लवकर विद्यार्थी ते आत्मसात करतील.
- **शिक्षण व्यावसायिक कामाशी जोडलेले असावे** : शिक्षण सर्वांना मोफत, सक्तीचे आणि सहज उपलब्ध होईल असे असावे. तसेच शिक्षण हे व्यावसायिक कामाशी संबंधित असले पाहिजे. प्राथमिक शिक्षण हे कृती-केंद्रित असले पाहिजे कारण अनुभव हा सर्व ज्ञानाचा आधार मानला जातो. यात ‘करा आणि शिका’ या तत्त्वाला प्राधान्य देण्यात आले आहे.
- **काम हे समाजोपयोगी आणि उपजीविकेसाठी उपयोगी असावे :** विद्यार्थ्यांना ज्या कामाचे शिक्षण देण्यात येईल ते त्यांना रोजगार देणारे आणि समाजोपयोगी असले पाहिजे. नई तालीम अनुसार

शिक्षणाचा आधार सामाजिक असावा त्यानुसार मुलाचे सामाजिक गुण विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो.

- **विद्यार्थी केंद्रित शिक्षण :** नई तालीम अंतर्गत शिक्षण हे विद्यार्थी केंद्रित असावे यावर भर दिला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गरजा जाणून घेतल्यानंतर त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे मुल शाळेच्या प्रत्येक कामात आणि प्रयत्नात पूर्ण रस घेते.

- **शारीरिक श्रमाचे महत्त्व :** या अंतर्गत विद्यार्थ्यांना शारीरिक श्रमाचे महत्व कळावे म्हणून हाताने काम करायला शिकवले जाते. ब्रिटिश लोक शारीरिक श्रमाला कमी लेखतात. 'इंग्रजी शिक्षणाने सर्व भारतीयांना निरुपयोगी बनवले आहे' असा महात्मा गांधींचा समज होता.

- **विद्यार्थ्यांमध्ये आत्मनिर्भरतेच्या भावनेचा विकास :** नई तालीम अंतर्गत विद्यार्थी हस्तोद्योगद्वारे उत्पादित वस्तू विकून आपला किरकोळ खर्च भागवू शकतो आणि स्वावलंबी होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मनिर्भरतेची भावना निर्माण होते.

- **विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि आध्यात्मिक विकास :** नई तालीम मध्ये मुलाच्या आध्यात्मिक विकासाकडे पूर्ण लक्ष दिले जाते आणि त्याच्या आध्यात्मिक गरजा पूर्ण करते. या शिक्षणामुळे मुलाला त्याच्या आणि सामाजिक जीवनाच्या परिपूर्तीचा आनंद जाणवतो.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि नई तालीम यातील साम्य**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत शालेय शिक्षणातील उल्लेखनीय बदल हे महात्मा गांधींच्या शिक्षणाच्या विचारांशी सुसंगत आहेत. या नवीन धोरणातील बहुतेक बदल हे 'नई तालीम' शिक्षण पद्धतीत समाविष्ट होते. जसे की, शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवाहांमधील अंतर कमी करणे, बहुभाषिकतेला प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम निवडण्यासाठी लवचिकता प्रदान करणे किंवा स्थानिक समुदायाच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी केलेले प्रयत्न इ.

- **समतापूर्ण समाजाचे निर्माण** :

महात्मा गांधींच्या दृष्टीने, शांततेच्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षण हे मूल्य आणि नैतिकतेवर आधारित असले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. शिक्षणाने नैतिकतेची जाणीव असलेली चारित्र्यवान पिढी घडली पाहिजे असा त्यांचा मानस होता. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 सुद्धा समतापूर्ण, सृजनशील, सुसंस्कृत समाजाचे निर्माण व्हावे या दृष्टीने निर्माण केले आहे.

- **मातृभाषेतून शिक्षण** :

नई तालीम दृष्टीकोन हा तर्कावर आधारित मातृभाषेतून शिक्षण देण्यावर केंद्रित आहे. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास विद्यार्थ्यांना शिकायला समजायला सहज होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 सुद्धा प्रत्येक मुलासाठी

तीन-भाषेच्या सूत्राच्या महत्त्वावर जोर देते आणि मुलांना बहुभाषिक होण्यासाठी प्रोत्साहित करते. यात प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून शिकण्यावर भर देण्यात आला आहे.

- **कौशल्य आधारित शिक्षण** :

नई तालीम मध्ये विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला होता. यात शिक्षण हे विद्यार्थी केंद्रित असावे यावर भर दिला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अभ्यासक्रम निवडण्यात विद्यार्थ्यांना लवचिकता प्रदान करण्याचे सुचवते. तसेच विद्यार्थ्यांना कौशल्ये शिकवून त्यांच्यामध्ये कौशल्य विकास करण्यासाठी भर देते. जेणेकरून विद्यार्थ्यांना रोजगार मिळेल किंवा ते उद्योजक बनून रोजगार प्रदान करतील.

- **रोजगारांमुख शिक्षण** :

नई तालीम नुसार शिक्षण हे दैनंदिन जीवनातील व्यावहारिक उपक्रमावर आधारित आणि विद्यार्थ्यांना रोजगार प्रदान करणारे असावे असे म्हटले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विद्यार्थ्यांना उपक्रम आधारित व्यावसायिक शिक्षण देण्यावर भर देत आहे. व्यावसायिक शिक्षण हे माध्यमिक वर्गापासून देण्यात येईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने एक नवीन आशा आणली आहे की ज्या उद्देशाने धोरण तयार केले होते त्याच हेतूने जर ते धोरण राबवले गेले तर महात्मा गांधींचे स्वप्न पूर्ण होईल.

- **व्यावहारिक शिक्षण** :

नई तालीम दृष्टिकोनाने शिक्षणाची संकल्पना मांडली जी केवळ पुस्तकी ज्ञानावर निर्भर नसून तिची व्यापकता ही पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे होती. पुस्तकी ज्ञानासोबत विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान देण्यावर भर होता. नई तालीम द्वारे सामाजिक संवेदना असलेली राष्ट्र उभारणीमध्ये सहभाग असलेली पिढी उभारणे हा उद्देश होता. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे राष्ट्राचे भविष्य घडवण्यात शिक्षकाच्या भूमिकेची कबुली देते. यात शिक्षकांना अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रातील बारीकसारीक पैलू निवडण्यासाठी अधिक स्वायत्तता देणे याची तरतूद केली आहे.

- **सामुदायिक शिक्षण** :

नई तालीम नुसार विद्यार्थ्यांच्या स्थानिक परिसरातील हस्तोद्योगाशी संलग्न करून त्यांना शिक्षण दिले जावे असे अभिप्रेत आहे. शिकण्याची पद्धत व्यावहारिक उपक्रम आणि अनुभवावर आधारित असावी. विद्यार्थ्यांना शिकविताना समाजाला सहभागी करून घेण्याचा त्यात प्रयत्न केला होता. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये सुद्धा स्थानिक उद्योगांना शिक्षण व्यवस्थेत सामील होण्यासाठी आणि शिक्षणाद्वारे राष्ट्र उभारणीच्या कार्यात योगदान देण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी यंत्रणा विकसित करण्याबाबत चर्चा केली आहे.

**निष्कर्ष (Conclusion)**

भारत सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल करण्याचे प्रयत्न सुरू केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 द्वारे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेच्या सर्व पैलूंची सुधारणा, त्याचे नियमन आणि 21 व्या शतकातील महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांशी सुसंगत असलेली नवीन व्यवस्था निर्माण करण्यासाठी भारताच्या परंपरा आणि मूल्य प्रणालींवर आधारित आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बहुतांश बदल हे

महात्मा गांधीजींच्या नई तालीम या शिक्षा पद्धतीशी निगडित आहे. याबाबत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये उल्लेख केला नाही आहे. तथापि, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि नई तालीम यातील साम्य नाकारता येत नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत शालेय शिक्षणातील उल्लेखनीय बदल हे महात्मा गांधींच्या शिक्षणाच्या विचारांशी सुसंगत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये मांडलेल्या शिक्षणाचा दृष्टीकोन असे सुचवितो की गांधींच्या शिक्षणावरील कल्पना आजही प्रासंगिक आहेत कारण ते सध्याच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये नई तालीमचे काही महत्त्वाचे घटक आणण्याचा प्रयत्न करते. तत्कालीन परिस्थितीनुसार महात्मा गांधीजीनी मांडलेला शैक्षणिक दृष्टीकोन सद्यस्थितीनुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने मांडला आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षपुर्ती नंतरसुद्धा दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक असमानता इ. समस्या पूर्णपणे संपल्या नाहीत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने एक नवीन आशा आणली आहे की ज्या उद्देशाने धोरण तयार केले होते त्याच हेतूने जर ते धोरण राबवले गेले तर समतापूर्ण, सृजनशील, सुसंस्कृत समाजाचे निर्माण होईल. महात्मा गांधीजींचे स्वप्न पूर्ण होईल.

**संदर्भ (References)**


- गांधी, मो. (2004), रचनात्मक कार्यक्रम. (त्रिवेदी, का., भाषांतर), अहमदाबाद: नवजीवन प्रकाशन मंदिर. (मूळ प्रकाशन 1958).
- गांधी, मो. (2018), मंगल प्रभात. (नानावटी, अ. ठा., भाषांतर), अहमदाबाद: नवजीवन प्रकाशन मंदिर. (मूळ प्रकाशन 1958).
- सेवाग्राम आश्रम परिचय, वर्धा: सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान प्रकाशन.
- शिरोडे सुजाता **(2021),** महात्मा गांधीप्रणीत नई तालीम, अमरावती: आधार पब्लिकेशन.
- पोते अभिन. कुलथे प्रवीण **(2021),** महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार, अमरावती: आधार पब्लिकेशन.
- https://joshbadhao.com/%E0%A4%B5%E0%A4%B0%E0%A5%8D%E0%A4%A7%E0%A4%BE-%E0%A4%AF%E0%A5%8B%E0%A4%9C%E0%A4%A8%E0%A4%BE-%E0%A4%A8%E0%A4%88-%E0%A4%A4%E0%A4%BE%E0%A4%B2%E0%A5%80%E0%A4%AE-%E0%A4%95%E0%A5%80-%E0%A4%AE%E0%A5%81/
- https://m.timesofindia.com/education/news/new-education-policy-follows-mahatma-gandhis-nai-talim-venkaiah-naidu/amp_articleshow/88689833.cms
- https://www.chronicleindia.in/hindi/current-affairs/6497-nai-talim
- https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf
- https://www.google.com/amp/s/www.thequint.com/amp/story/news/education/resemblance-of-mahatama-gandhis-nai-talim-in-nep-2020

- https://www.indiatoday.in/education-today/featurephilia/story/a-reality-check-on-nep-2020-major-challenges-in-implementation-1711197-2020-08-14
- https://www.mkgandhi.org/articles/g_edu.htm#:~:text=According%20to%20Gandhi%2C%20education%20is,based%20on%20these%20two%20concepts.
- https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1654058
- https://www.sentinelassam.com/editorial/nep-2020-opportunities-challenges-510894
- https://www.thequint.com/news/education/resemblance-of-mahatama-gandhis-nai-talim-in-nep-2020
- https://www.youtube.com/watch?v=f7aGFcEsY4Y
- https://youtu.be/LM8Lyz1usx8